Rcvd 23/5/2013 Ordinary Post

**महाराष्ट्र शासन**

क्र. मुसका २०१३/माअ-४६१/का.१
मुख्य सचिवांचे कार्यालय
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : ०७.०५.२०१३

प्रति,

**श्री/श्रीमती कानिझ सुखरानी**
**ए/३, हर्मस ड्रोम १, २११/३/१बी, विमान नगर,**
**पुणे ४११ ०१४.**

**विषय:- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार माहिती मिळण्याबाबत.**
**संदर्भ :- आपला दि. २९.०४.२०१३ चा अर्ज**

महोदय,

वरील विषयांतर्गत मुख्य सचिव कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांना सादर केलेल्या दि. २९.०४.२०१३ (प्रत्यक्षात दि. ०२.०५.२०१३ रोजी प्राप्त) च्या अर्जास अनुलक्षून आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अर्जात नमूद बाब सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित आहे. त्यामुळे आपला माहितीचा अधिकार कायदा २००५ अंतर्गत दाखल केलेला दि. २९.०४.२०१३ चा अर्ज उक्त कायद्यातील कलम ६(३) नुसार अवर सचिव (का.६), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२ यांच्या कार्यालयाकडे हस्तांतरीत करण्यात येत आहे. कृपया या प्रकरणी पुढील पत्रव्यवहार संबंधित विभागांच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे करण्यात यावा.

या उत्तराने आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अवर सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई ४०००३२ यांच्याकडे उत्तर प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत अपिल करु शकता.

आपला,
०७/०५/२०१३
**( रा. शा. कौरते )**
**कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी**
**मुख्य सचिवांचे कार्यालय**